राज्यातील उच्च माध्यमिक शाळांमध्ये दिनांक २ मे, २०१२ नंतर ना-हरकत प्रमाणपत्र न घेता नियुक्त केलेल्या शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

शासन निर्णय क्रमांकः एसएसएन २०१७/(प्र.क्र.९३/१७)/टीएनटी-२

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १३ मार्च, २०१८.

वाचा :

१) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उच्च माध्य-२४१/ना.ह.प्र./२०१७/८००९, दिनांक १७.११.२०१७

२) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.उच्च माध्य-२४१/ना.ह.प्र./२०१७/८५५४, दिनांक ८.१२.२०१७

प्रस्तावना :

राज्यातील सर्व मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित व विना अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती व वैयक्तिक मान्यतेसंदर्भात दि.६.०२.२०१२ च्या शासन निर्णयान्वये मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि विशेष पट पडताळणी मोहीमेअंतर्गत आढळून आलेल्या सर्व अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन होईपर्यत दि.२.०५.२०१२ च्या शासन निर्णयान्वये पदभरतीवर बंदी घालण्यात आली होती. त्यानंतर दि.२०.०६.२०१४ व दि.१९ जुलै, २०१४ च्या शासन निर्णयांन्वये व दि.४ जून, २०१६ च्या शुध्दीपत्रकान्वये पद भरतीवरील निर्बंध उठविण्यात आले होते. तसेच पदे भरताना व वैयक्तिक मान्यता देताना अनुसरावयाची कार्यपध्दती देखील सदर शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आली होती. त्यामुळे उच्च माध्यमिक शाळांमध्ये समायोजनाकरीता अतिरिक्त शिक्षक उपलब्ध नसल्यामुळे विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन रिक्त पदांवर शिक्षकांची नियुक्ती करण्याकरीता सक्षम प्राधिकाऱ्यांनी ना-हरकत प्रमाणपत्र देणे अपेक्षित होते.

२. तथापि संपूर्ण राज्यात उच्च माध्यमिक शाळांमध्ये अतिरिक्त शिक्षक उपलब्ध नसून देखील संबंधित विभागीय शिक्षण उप संचालक यांनी ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान केले नाहीत. दरम्यान रिट याचिका क्र.६६०६/२०१५ व ६६०७/२०१५ मध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ नागपूर यांनी

दि.१७.०६.२०१६ रोजी दिलेल्या आदेशानुसार ना हरकत प्रमाणपत्रा शिवाय पदभरती केलेल्या पदांना वैयक्तिक मान्यता देण्यात येऊ नये, अशा सूचना दि.१.०७.२०१६ च्या पत्रान्वये देण्यात आल्या होत्या. या संदर्भात दि.२७.१०.२०१६ च्या परिपत्रकाव्दारे देखील सूचना देण्यात आल्या होत्या. त्यामुळे शैक्षणिक संस्थांनी दि.२.०५.२०१२ नंतर पदभरती केलेल्या शिक्षकांना नियमित करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन महासंघ या शिक्षक संघटनेने शासनाकडे वेळोवेळी केली होती. यासंदर्भात दिनांक १०.३.२०१७ रोजीच्या बैठकीत दिलेल्या सूचनांनुसार शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी दि.१५ ते १९ एप्रिल, २०१७ या कालावधीत विभागीय स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करुन वैयक्तिक मान्यता देण्याचे प्रस्ताव तपासले. तपासणी अंती केवळ ना- हरकत प्रमाणपत्र नसल्यामुळे वैयक्तिक मान्यता न दिलेले प्रस्ताव शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) यांनी शासनास सादर केले आहेत. सदर शिक्षकांना वैयक्तिक मान्यता प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:

राज्यातील सर्व उच्च माध्यमिक शाळांमध्ये दिनांक २ मे, २०१२ नंतर नियुक्त केलेल्या शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यतांबाबत दिनांक १५ ते १९ एप्रिल,२०१७ या कालावधीत विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे स्तरावर वैयक्तिक मान्यता शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ज्या शिक्षकांच्या नियुक्तीच्या वेळी अतिरिक्त शिक्षक नव्हते त्यांच्या वैयक्तिक मान्यतेचे प्रस्ताव शिक्षण संचालक यांनी शासन मान्यतेस्तव सादर केले आहेत. यासंदर्भात महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन अधिनियम, १९७७ मधील कलम ५(१) मधील तरतुदीच्या अनुषंगाने व विधि व न्याय विभागाने दिलेल्या अभिप्रायानुसार ना हरकत प्रमाणपत्र न घेता दि.२ मे, २०१२ नंतर नियुक्त केलेल्या शिक्षकांना खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून वैयक्तिक मान्यता देण्यास परवानगी देण्यात येत आहे :-

१) उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षकांना वैयक्तिक मान्यता देताना प्रत्येक शिक्षकासाठी स्वतंत्रपणे वैयक्तिक मान्यतेचे आदेश विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी काढावेत. संबंधित विषयाचे अतिरिक्त शिक्षक उपलब्ध नसल्याची खात्री करुन तसे प्रत्येक आदेशात नमूद करावे.

२) वैयक्तिक मान्यता देताना बिंदुनामावली, आरक्षण व शासनाच्या इतर प्रचलित नियमांप्रमाणे प्रकरण तपासून त्याबाबतचा तपशील प्रत्येक आदेशात स्पष्ट करावा.

३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी दिनांक १७.११.२०१७ व दिनांक ८.१२.२०१७ च्या संदर्भाधीन पत्रान्वये सादर केलेल्या शिक्षकांनाच वैयक्तिक मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात यावी. त्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकरणी सदर आदेश लागू होणार नाहीत. सदर शिक्षकांची यादी संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालक यांना शासनाच्या अर्धशासकीय पत्राद्वारे आधार क्रमांकाच्या शेवटच्या चार अंकासह पोहोच करण्यात येईल.

२. उपरोक्त शासन निर्णयान्वये वैयक्तिक मान्यता दिलेल्या प्रकरणांच्या आधारे क्षेत्रिय स्तरावरुन अन्य प्रकरणी वैयक्तिक मान्यता देण्यात येऊ नये. वरील निर्णय पूर्वोदाहरण म्हणून ग्राहय धरण्यात येणार नाही.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१३१६३१०५१८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

J. S. Raskar

Digitally signed by J. S. Raskar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=04640d2030eaa3854379434ab85482042a072e8a601095b5f7aa8d67b9b02db2, cn=J. S. Raskar
Date: 2018.03.14 11:20:58 +05'30'

(ज.शि.रासकर)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

२. शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

३. सर्व विभागीय शिक्षण उप संचालक

४. मा.मंत्री (शा.शि.व क्री.वि.) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

५. मा.प्रधान सचिव, (शा.शि.व क्री.वि.) यांचे स्वीय सहाय्यक.मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

६. शालेय शिक्षण विभागातील सर्व कार्यासने.

७. निवडनस्ती, टीएनटी-२.